# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यात कोरोना चाचणीसाठी वापरण्यात येत असलेली आर.टी.पी.सी.आर. किट्स सदोष आढळून आल्याबाबत

**(१) ४९९० (१७-११-२०२०) श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.महादेव जानकर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना चाचणीसाठी वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत डीएमईआरमार्फत तसेच आरोग्य संचालनालयामार्फत खरेदी करून सर्व जिल्हा पातळीवर वितरीत केलेली व वापरात येत असलेली सुमारे १२ लाख ५० हजार आर.टी.पी.सी.आर. किट्स सदोष आढळून आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जी.सी.सी.बायोटेक प्रा. लिमिटेड कंपनीने पुरविलेल्या चाचणी किट्स सदोष असल्याचा अहवाल राष्ट्रीय विषाणू संस्थेने (एनआयव्ही) दिला असून कोरोना रूग्णांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार शासनाकडून झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गंभीर प्रकरणाची विनाविलंब एमआयटीमार्फत चौकशी करण्यात यावी आणि संबंधित दोषी अधिकारी तसेच कंपन्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद तसेच काही लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री आदींकडे केली असून सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(४) असल्यास, शासन आर.टी.पी.सी.आर. किट्स सदोष आढळल्याबाबत विशेष समिती नेमणार आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदोष किट्स पुरविणाऱ्या कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२३-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सदर चाचणी किट्सबाबत राष्ट्रीय विषाणू संस्था, (NIV), पुणे यांनी चाचणी किट योग्य असल्याबाबतचा अहवाल दिल्यानंतरच सर्व प्रयोगशाळांना चाचणी किट्स वाटप करण्यात आले आहे.
(३), (४) व (५) होय. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने या संदर्भात दिनांक ०७/१०/२०२० रोजीच्या आदेशान्वये ५ सदस्यीय समितीचे गठण केले आले. संचालनालयाने गठण केलेल्या ५ सदस्यीय समितीने सादर केलेल्या अहवालानुसार या संदर्भातील बाब हाफकिन महामंडळाच्या निदर्शनास आणून देऊन सदर कंपनीला देण्यात आलेला पुरवठा आदेश रद्द करण्यात आला तसेच आर.टी.पी.सी.आर. किट्सच्या देयकांची अदायगी करण्यात आली नाही.

---

## राज्यातील लोककलावंताना आर्थिक पॅकेज जाहीर करण्याबाबत

**(२) ५५७८ (२३-११-२०२०) डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना काळात लोककलावंताना आर्थिक पॅकेज जाहीर करण्यात यावे, त्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम सुरु करण्यात यावे या मागण्यांसाठी प्रबोधनकार कला साहित्य संघटना शाखा, भंडारा व गोंदिया येथील पदाधिकाऱ्यांनी मोर्चा काढून जिल्हाधिकारी यांना निवेदन दिल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कलावंताना देण्यात येत असलेले मानधन तुटपुंजे असल्याने तसेच अनेक कलावंतांना उपजिविकेचे पुरेशे साधन उपलब्ध होत नसल्यामुळे या मानधनात वाढ करण्यात यावी अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१५-०२-२०२२)** : (१) होय.

(२) व (३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय पुरक/ ६११९/ प्र.क्र.८३/ सां.का.४, दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ अन्वये वृध्द साहित्यिक व कलावंत मानधन योजनेंतर्गत सन्मानार्थ्यांच्या निवड इष्टांक ६० वरुन १०० व मानधनाच्या रकमेत दिडपट वाढ करण्यात आली आहे. तसेच पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२०/ प्र.क्र.१४७/ सां.का.४, दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१ अन्वये कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रयोगात्मक कलेच्या प्रकारातील कलाकार, कलासमुह यांना एकरकमी अर्थसहाय्य देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार राज्यातील ५६००० कलाकारांना प्रत्येकी एकरकमी रुपये ५,०००/- प्रमाणे रुपये २८.०० कोटी व ८४७ लोककला पथकांना रुपये ६.०० कोटी व त्यांच्या निवड प्रक्रियेसंदर्भातील प्रशासकीय खर्च यासाठी रुपये १.०० कोटी असे एकूण रुपये ३५.०० कोटी एकरकमी अर्थसहाय्य करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय कर्मचाऱ्यांच्या शासकीय निवासस्थानांमध्ये कर्मचारी अनधिकृतपणे राहत असल्याबाबत

**(३) ५७१३ (१४-१२-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय कर्मचाऱ्यांच्या शासकीय निवासस्थानांमध्ये २५ टक्के कर्मचारी अनधिकृतपणे राहत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१७-०२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) राज्यातील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या संस्थांमध्ये शासकीय निवासस्थानांची एकूण संख्या ४१४३ असून त्यापैकी ४० निवासस्थानांमध्ये सेवानिवृत्त कर्मचारी राहत आहेत. सदर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी शासकीय निवासस्थाने रिक्त करण्याबाबत संबंधित संस्थांच्या संस्थाचालकांकडून वेळोवेळी नोटीस देण्यात आल्या असून त्यांचेकडून दंडनिय भाडेसुद्धा वसूल करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रेवदंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील आगरकोट किल्ल्याच्या तटबंदीची दुरुस्ती करण्याबाबत

**(४) ६१४४ (१४-१२-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेवदंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील आगरकोट किल्ल्याची तटबंदी समुद्राच्या लाटांनी कोसळली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने किल्ल्याच्या तटबंदीची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१७-०२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन किल्ल्याच्या तटबंदीची कालपरत्वे पडझड झाली आहे.

(२) या किल्ल्याच्या तटबंदीचा बराचसा भाग हा खाजगी मालकीचा आहे. तसेच काही भाग हा भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाचा संरक्षित केलेल्या विनियमित क्षेत्रात येतो. याबाबत सर्व कागदपत्रे तसेच साक्षांकित केलेले नकाशे मिळविण्यासाठी सहायक संचालक, पुरातत्व विभाग, रत्नागिरी या कार्यालयामार्फत भारतीय पुरातत्व सर्वेक्षण व जिल्हा प्रशासनास विनंती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आंबडवे (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) गावाच्या विकास आराखड्यातील कामे पूर्ण करण्याबाबत

**(५) ६३५७ (१५-०३-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबडवे (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) गावाच्या विकासासाठी केंद्र शासनाकडून रूपये २०५ कोटी मंजूर करण्यात आले असून अद्यापही गावाच्या विकासाची कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीतून कोणती कामे हाती घेण्याचे शासनाने नियोजन केले होते तसेच सदरहू गावाच्या विकासासाठी तयार केलेल्या आराखड्यातील किती व कोणती कामे हाती घेण्यात आली, किती पूर्ण झाली व किती प्रलंबित आहेत,

(३) असल्यास, आंबडवे गावाच्या विकासासाठी शासनाने तयार केलेल्या आराखड्यातील कामे प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत व पूर्ण झालेल्या कामावर किती निधी खर्च करण्यात आला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने आंबडवे गावाच्या विकासासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्यातील कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२३-०२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

(मौजे आंबडवे, ता.मंडणगड, जि.रत्नागिरी या गावाच्या विकासासाठी मा.खासदार श्री.अमर साबळे, राज्यसभा सदस्य यांनी सांसद आदर्श ग्राम योजनेंतर्गत ग्रामपंचायत आंबवडे येथील रुपये १,२४,८३,४१८/- रकमेची सात कामे प्रस्तावित केली होती. केंद्र शासनाच्या डॉ. आंबेडकर प्रतिष्ठान, सामाजिक न्याय व आधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडून दिनांक ०४/०५/२०१७ अन्वये सदर कामांना रुपये ६२.४० लक्ष इतका निधी वितरीत केला आहे.)

(२) सदर रुपये १२५.०० लक्ष निधीतून सात कामे घेण्यात आली, त्यापैकी पाच कामे पूर्ण झाली असून दोन कामे प्रलंबित आहेत.

(३) जागेच्या अभावी दोन कामे प्रलंबित आहेत. पूर्ण झालेल्या कामांवर रुपये ३६.३२ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे.

(४) याबाबत केंद्रिय समितीने दिनांक ०८/११/२०२१ रोजी कामाचे ठिकाणी भेट दिली असून कामे पूर्ण करणे व निधीची मागणी करण्याच्या सुचना देण्यात आल्या तसेच जिल्हाधिकारी, रत्नागिरी आणि जिल्हा नियोजन अधिकारी यांनी दिनांक १९/११/२०२१ रोजी कामाच्या ठिकाणी भेट देऊन सदर कामांची तपासणी केली असता सात कामापैकी पाच कामे पूर्ण व दोन कामे प्रलंबित आढळून आली. झालेल्या पूर्ण कामांची छायाचित्र, उपयोगिता प्रमाणपत्र यांच्यासह उर्वरीत निधीकरीता प्रतिष्ठानकडे जिल्ह्यामार्फत मागणी सादर केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लासूर स्टेशन (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतर ग्रामीण रुग्णालयात करण्याबाबत

**(६) ८९२० (१५-०७-२०२१) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासूर स्टेशन (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना सन १९६९ मध्ये झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत पंचक्रोशीतील प्रति दिवस ८० ते ९० खेड्यातील रुग्णसंख्या २०० ते २५० असून प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत ५० वर्षापूर्वीची जूनी असल्याने ती मोडकळीस आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यासह कर्मचारी वर्ग कमी असून औषधाचा तुटवडा असतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने लासूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतर ग्रामीण रुग्णालयात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (११-०३-२०२२) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र लासूर स्टेशन येथील इमारत जुनी असल्यामुळे जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकामासाठी रुपये ६.०० कोटी रकमेस नियोजन समितीमधून निधी उपलब्ध होण्याच्या व मान्यतेच्या अधिन राहून व जिल्हा परिषद वित्त विभागाच्या सहमतीने सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र लासूर स्टेशन येथे एकूण १८ पदे मंजूर असून त्यापैकी ३ वैद्यकीय अधिकारी असून सदर ३ ही पदे भरलेली आहेत. उर्वरित १५ कर्मचाऱ्यांच्या पदांपैकी १० पदे भरलेली असून ५ पदे रिक्त आहेत. तसेच सदरील रिक्त पदे जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील आरोग्य विभागातील असून सदर रिक्त पदे भरण्यास ग्रामविकास विभागाच्या दिनांक १४/०६/२०२१ रोजीच्या शासन आदेशान्वये मंजूरी मिळाली असून पदभरतीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र लासूर स्टेशन येथे पुरेशा प्रमाणात औषंधाचा पुरवठा नियमित केला जातो.

प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतर ग्रामीण रुग्णालयामध्ये करण्याबाबत सदर प्रस्ताव आयुक्त, आरोग्य सेवा यांना प्राप्त झाला होता. सदर प्रस्तावामध्ये त्रुटी असल्यामुळे त्रुटींची पूर्तता करण्याबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळ, औरंगाबाद यांना कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कोरोनामुळे झालेले मृत्यू व सार्वजनिक आरोग्य विभागाकडील आकडेवारी यामध्ये तफावत असल्याबाबत

**(७) ९७४३ (१७-०६-२०२१) श्री.विनायकराव मेटे, श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात माहे मार्च, २०२० ते जून, २०२१ या कालावधीत झालेल्या एकूण मृत्यूपैकी सर्वाधिक मृत्यू कोरोनामुळे झाले असून कोरोनामुळे झालेले मृत्यू व सार्वजनिक आरोग्य विभागाकडील आकडेवारी यात तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंबेजोगाई व बीड येथे मृत कोरोनाग्रस्तांवरील अंत्यसंस्कार आणि पोर्टलवरील मृत्यूच्या नोंदीत १०५ एवढी तफावत असल्याचे निदर्शनास आले असून सदर प्रकरणी चौकशीसाठी पाच सदस्यांची समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोर्टलवर मृत्यूची नोंद करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वाराती रुग्णालयाचे अधिष्ठाता, जिल्हा शल्यचिकित्सकासह संबंधितांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागाने कोरोनामुळे झालेल्या मृत्यूची नोंद न घेता नैसर्गिक वा इतर कारणामुळे झालेल्या मृत्यूची नोंद घेतली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२२-०२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कोविड-१९ संदर्भातील माहितीचा आकार व माहिती संकलनासाठी वापरण्यात येणाऱ्या संगणकीय प्रणालीच्या तांत्रिक मर्यादा यामुळे आकडेवारीतील तफावत निर्माण झाली. तथापि, वेळोवेळी आकडेवारीचे रिकॉन्सिलिएशन/ ताळमेळ प्रक्रिया करुन ही तफावत दुर करण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

बीड जिल्ह्यातील कोविड-१९ मृत्यू संदर्भातील आकडेवारी तफावतीबाबत सहा.जिल्हा आरोग्य अधिकारी साथरोग वैदयकीय अधिकारी आणि सांख्यिकी अधिकारी यांची समिती नेमण्यात आलेली होती. त्या समितीने तफावतीची कारणे शोधुन आकडेवारी निर्दोष करण्याचे काम केले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागाने, कोविड-१९ संदर्भातील आकडेवारीचा मोठा आकार आणि माहिती संकलनातील तांत्रिक मर्यादा लक्षात घेऊन वेळोवेळी प्रक्रियेने माहिती अचुकपणे नोंदविण्याचे प्रयत्न केले आहे.

(५) होय, हे खरे आहे.

बीड जिल्ह्यात माहे एप्रिल व मे, २०२१ मध्ये कोविड-१९ रुग्णसंख्येत अचानक वाढ झाल्यामुळे कोविड-१९ पोर्टलवर मृत्यूच्या नोंदी भरण्यात आलेल्या आहेत.

१०५ कोविड मृत्यूची नोंद कोविड पोर्टलवर भरण्याचे राहिले होते या सर्व नोंदी पोर्टलवर करण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील संगणक परिचालकांना आयटी महामंडळात सामावून घेणेबाबत

**(८) ९८२३ (१५-०७-२०२१) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गत अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यातील सुमारे २७००० संगणक परिचालकांना आयटी महामंडळात सामावून घेण्याच्या प्रश्नावर विधान परिषद सभागृहात मागणी करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.ग्रामविकास मंत्री महोदयांनी संगणक परिचालक संघटनेला लवकरच प्रश्न सोडविण्याचे लेखी आश्वासन दिनांक ११ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील २७००० संगणक परिचालकांना आयटी महामंडळात सामावुन घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१७-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.यावलकर समितीच्या शिफारसीनुसार संगणक परिचालक पद निर्मिती लवकरात लवकर करण्याबाबत दिनांक ११ मार्च, २०२१ रोजीच्या पत्रान्वये संगणक परिचालक संघटनेला कळविण्यात आले होते. त्यानुसार संगणक परिचालकांचा (डाटा ऑपरेटर) ग्रामपंचायत कर्मचारी आकृतिबंधामध्ये सामावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे. तसेच केंद्र शासनाकडून सदर योजनेस मुदतवाढ देण्यात आली असल्याने त्यांच्याकडे निधीची मागणी करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कॅन्सर इन्स्टिट्यूटची जमीन संस्थेच्या नावे करुन बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(९) ९९३७ (१७-०६-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रसाद लाड : तारांकित प्रश्न क्रमांक ६४९४ ला दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मेडिकलच्या प्रस्तावित कॅन्सर इन्स्टिट्यूटची जमीन संस्थेच्या नावे नसल्यामुळे बांधकाम करण्यास आवश्यक परवानगी प्रलंबित असून नागपूर महानगर प्रदेश विकास (NMRDA) प्राधिकरणाकडून निविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरू केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कॅन्सर इन्स्टिट्यूट उभारणीसाठी सन २०२०-२०२१ व २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कॅन्सर इन्स्टिट्यूटची जमीन संस्थेच्या नावे करुन सदर बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (१४-०३-२०२२) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) सदर जमीन संस्थेच्या नावे करणेबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेकडे कार्यवाही सुरु असून सदर बांधकामासाठी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## घाटी रुग्णालय (औरंगाबाद) येथील सुपरस्पेशालिटी रुममधील यंत्रसामुग्री विनावापर असल्याबाबत

**(१०) १००८५ (१५-०७-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घाटी रुग्णालय (औरंगाबाद) येथील सुपरस्पेशालिटी रुममध्ये मागील वर्षभरापासून कोट्यवधीची यंत्रसामुग्री विनावापर पडून असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आह काय,
(२) असल्यास, ऑपरेशन थिएटरमधील अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, कॅथलॅबसाठी असणारी अशी अत्याधुनिक यंत्रे विनावापर पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र आणि राज्य शासनाच्या रुपये १५० कोटी निधीतून खरेदी केलेली यंत्रे विनावापर पडून राहण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२७-१२-२०२१) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनामार्फत प्राप्त व्हेंटीलेटर, मॉनिटर, एमजीपीएस प्लॅन्ट, डिफीब्रिलेटर इत्यादी यंत्रसामुग्री कोविड रुग्णांच्या उपचाराकरीता वापरण्यात आली आहे.

ऑपरेशन थिएटरमधील अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, कॅथलॅबसाठी असणारी अशी अत्याधुनिक यंत्रांचे स्थापत्य झालेले आहे.

सदर इमारत ही कोविड-१९ घोषित असल्यामुळे त्यांचा संसर्ग नॉन कोविड रुग्णांवर होवू शकतो, ही बाब जोखमीची असल्याने कॅथलॅब सुरु करण्याबाबत तज्ञ समितीचे अभिप्राय घेवून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदरूख-गिरोबा मंदिर मार्गे-आनंदव्हाळ (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(११) १०१९९ (२७-०९-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदरूख-गिरोबा मंदिर मार्गे-आनंदव्हाळ (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथे प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत तयार करण्यात आलेल्या रस्त्याची देखभाल व दुरुस्ती अभावी मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून स्थानिक ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याची बाब दिनांक २५ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले असून रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या पट्ट्यादेखील खराब झाला असल्याने वाहनांना अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असून गिरोबा मंदिरानजीक चुकीच्या जागी मोरी असल्याने पावसाचे पाणी रस्त्यावर साठल्यामुळे चिखल होऊन अनेक दुचाकीस्वारांचे घसरून अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने रस्त्याची पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे व आवश्यक सुधारणांचे काम हाती घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१८-०२-२०२२) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) अंशतः खरे आहे.

सदर रस्त्यावर गिरोबा मंदिरानजीक खड्डा पडला असल्याने पाणी साचत आहे हे खरे आहे.
(३) सदर रस्त्याचे काम प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत पूर्ण होऊन १० वर्षे झाली आहेत. त्यामुळे शासन धोरणानुसार सदर रस्ता पुढील देखभाल दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करणेची कार्यवाही सूरु आहे. हस्तांतरणानंतर जिल्हा परिषदेस रस्ते व पूल दुरुस्ती अंतर्गत विविध योजनांमधून प्राप्त होणाऱ्या निधीतून तसेच जिल्हा वार्षिक योजनेमधून प्रश्नांकित रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीचे काम प्रस्तावित करणेबाबत जिल्हा परिषदेला सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे विद्यार्थी त्यांच्या हक्कांपासून वंचित असल्याबाबत

**(१२) १०२४० (०८-११-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षात प्रवेशासाठी विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेली मूळ कागदपत्रे एमबीए विभागातून अचानक गहाळ झाल्या प्रकरणीचा अहवाल विद्यार्थ्यांना न दिल्याने १० विद्यार्थी त्यांच्या हक्कांपासून वंचित असल्याचे माहे मे, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रकरणीचा चौकशी अहवाल विद्यार्थ्यांना तात्काळ देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१८-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या, सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी दिलेली मूळ कागदपत्रे एम.बी.ए. विभागातून गहाळ झाल्याप्रकरणी चौकशी करण्याकरिता मा.कुलगुरुंनी, डॉ.एस.एम.खेरडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. सदर समितीचा अहवाल विद्यापीठ कार्यालयास प्राप्त झाला असून समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी प्रथमदर्शनी दोषी आढळून आलेल्या दोन कर्मचाऱ्यांकडून स्पष्टीकरण प्राप्त झाले आहे. प्राप्त स्पष्टीकरण विचारात घेऊन दोन्ही कर्मचाऱ्यांना म.ना.से. (शिस्त व अपील) १९७९ च्या भाग ३ नियम क्र. १ एक अंतर्गत कार्यालयीन कर्तव्यात गैरवर्तणुकीचा ठपका ठेवण्यात येवून ताकीद देण्यात आली आहे.

सदर प्रकरणी तत्कालीन विभाग प्रमुख डॉ.एस.बी.सदार यांचेवर सुध्दा दोषारोप ठेवण्यात आले आहेत. डॉ.एस.बी.सदार यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही करण्याबाबत दिनांक १३/०१/२०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अधिसंख्य पदावरील अनेक कर्मचाऱ्यांचे पद रद्द करण्याचे आदेश औरंगाबाद खंडपीठाने पारित केल्याबाबत

**(१३) १०२७७ (०१-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ७१११ ला दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अधिसंख्य पदावरील अनेक कर्मचाऱ्यांचे पद रद्द करण्याचे आदेश औरंगाबाद खंडपीठाने पारित केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत शासकीय सेवेतील अधिसंख्य पदावर नियुक्ती करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत व सेवानिवृत्ती विषयक लाभ प्रदान करण्याबाबतच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करण्याकरिता दिनांक १४ जून, २०२० रोजी नेमलेल्या अभ्यासगटाने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने अधिसंख्य पदावरील सेवानिवृत्त व मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना निवृत्तीवेतन व इतर लाभ देण्यात आले आहे काय, तसेच दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ ते आजतागायत किती अधिसंख्य कर्मचारी सेवानिवृत्त झाले व किती कर्मचारी मृत्यू पावले आहेत, तसेच शासनाच्या नियमित सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना अशा पध्दतीने अधिसंख्य पदावर नियुक्ती देण्याचे प्रयोजन शासनाच्या सेवाशर्ती नियमानुसार आहे काय,

(४) तसेच उपरोक्त प्रकरणी श्री.जगदीश बहेरा व इतर विरूध्द एफ.सी.आय. ह्या खटल्याच्या अनुषंगाने दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निकालाची पूर्वलक्षी प्रभावाने अंमलबजावणी करण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करून सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्याची कारणे काय असून त्यास मंत्रिमंडळाची मान्यता प्राप्त झाली होती काय, याबाबत शासनाने चौकशी करून अधिसंख्य पदावरील सेवानिवृत्त व मृत कर्मचाऱ्यांना शासकीय लाभ मिळून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबत शासनाची भूमिका व सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२२-११-२०२१) :** (१) मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल रिट याचिका क्र.९०३/२०२० व इतर याचिका यामध्ये मा.न्यायालयाने दिनांक ०४/०५/२०२१ रोजी अनुसूचित जमातीचे दावे अवैध ठरलेल्या ज्या कर्मचाऱ्यांच्या सेवा मा.उच्च न्यायालयाने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०६/०७/२०१७ च्या शासन निर्णयापूर्वी संरक्षित केलेल्या आहेत व त्याविरुध्द शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात अपील केलेले नाही, त्या कर्मचाऱ्यांना विभागाचा दिनांक २१/१२/२०१९ चा शासन निर्णय लागू नसल्याचे आदेश पारित केलेले आहेत.

(२) व (३) दिनांक १५/०६/२०२० च्या शासन निर्णयान्वये मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या अभ्यास गटाचा अहवाल शासनास अद्याप प्राप्त झाला नाही.

अधिसंख्य पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या व मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती प्राप्त करुन घेण्यात येत आहे.

(४) व (५) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०६/०७/२०१७ च्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात कायदेशीर अभिप्राय प्राप्त करुन मंत्रिमंडळाच्या मान्यतेने दिनांक २१/१२/२०१९ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयानुसार अधिसंख्य पदावरुन सेवानिवृत्त व मृत झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवा विषयक/ सेवानिवृत्ती विषयक लाभ अनुज्ञेय करण्याबाबत अभ्यास गटाच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

---

## मुंबईतील कुलाबा-वांद्रे-सीप्झ (मेट्रो ३) प्रकल्पाच्या कारशेडबाबत

**(१४) १०४३८ (०६-१२-२०२१) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील : दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १७ मधील प्रश्न क्रमांक ८५६३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुलाबा-वांद्रे-सीप्झ (मेट्रो ३) प्रकल्पाच्या कारशेडची नवीन जागा निश्चित झाल्यास या भूमिगत मेट्रो प्रकल्पाचे भवितव्य संकटात सापडणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कारशेडच्या जागेत मूळ प्रकल्प आराखड्याव्यतिरिक्त बदल झाल्यास मेट्रोच्या कामास सुरक्षा आयुक्तालयाकडून परवानगी मिळण्याची शक्यता कमी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मेट्रो प्रकल्पाच्या कारशेडच्या जागेबाबत शासन पुन्हा निर्णय घेणार काय, त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

प्रचलित मार्गदर्शक तत्वे व वैशिष्ट्ये विचारात घेऊन तज्ञांमार्फत तांत्रिकदृष्ट्या सुसाध्य असे सुधारित आराखडा तयार करून अनुभवी संस्थेद्वारे त्याची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याने कारडेपो जागेच्या स्थानांतरणामुळे रेल्वे सुरक्षा आयुक्तालयाची परवानगी मिळण्यात अडचण उद्भवण्याची शक्यता नाही.
(३) व (४) मेट्रो प्रकल्प अंमलबजावणीतील कालापव्य व अतिरिक्त वित्तीय भार टाळणे तसेच प्रकल्पाची कार्यक्षमता व दिर्घकालीन नियोजन या दृष्टीकोनातून मेट्रो कारशेडसाठी पर्यायी जागा निश्चित करण्यासाठी गठीत केलेल्या समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेऊन शासनाने समितीच्या शिफारशी स्विकारल्या आहेत व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## मुंबईतील कांदळवन क्षेत्रातील (खारफुटी) अतिक्रमण रोखण्याकरिता सीसीटीव्ही यंत्रणा स्थापन करण्याच्या निर्णयाबाबत

**(१५) १०५४६ (०५-०१-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदळवन क्षेत्रातील (खारफुटी) अतिक्रमण रोखण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा स्थापन करण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा दरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर निर्णयावर कधीपर्यंत अंमलबजावणी होणार आहे व त्याची सर्वसाधारण रुपरेषा काय आहे,
(३) तसेच सदरहू सीसीटीव्ही यंत्रणा कोणकोणत्या क्षेत्रात व कोणकोणत्या ठिकाणी बसविण्यात येणार आहे याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१८-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) मुंबई महानगर क्षेत्रामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसवणेकामी प्रोजेक्ट मॅनेजमेंट सल्लागार (PMC) यांच्या नेमणूकीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाचा कालावधी १५.५ महिने असून त्यामध्ये RFP preparation, Bid Management, PMU during implementation and Post Go Live Handholding या बाबींचा समावेश आहे.
(३) मुंबई महानगर क्षेत्रामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा भिवंडी, पश्चिम मुंबई, मध्य मुंबई, नवी मुंबई व ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य एरोली या भागामध्ये बसविण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सहाय्यक प्राध्यापकांच्या पदोन्नतीचे नियमातील सुधारणा प्रलंबित असल्याबाबत

**(१६) १०७४९ (०६-०१-२०२२) श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सहाय्यक प्राध्यापकांच्या पदोन्नतीचे स्थान निश्चितीचे नियम अद्यापही युजीसीनुसार करण्यात आले नाही, तसेच प्राध्यापकांच्या पदोन्नतीबाबत अनियमितता असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदोन्नतीच्या नियमात सुधारणा करुन पदोन्नती समिती करीता प्रलंबित न ठेवता प्राध्यापकांच्या पात्रतेपासून त्यांची स्थान निश्चिती करावी, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदने सादर केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्राध्यापकांच्या पदोन्नतीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१७-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) शासन निर्णय दिनांक ०८/०३/२०१९ अन्वये राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांना सातव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेण्या लागू केलेल्या आहेत. शासन निर्णय दिनांक १०/०५/२०१९ अन्वये सदरहू शासन निर्णयात सुधारणा करण्यात आली आहे. यामध्ये ज्या अध्यापकांना Level १२ वरून Level १३ व Level १३ वरून Level १४ मध्ये स्थाननिश्चिती करताना ज्या दिवशी निवड समितीची बैठक होईल त्या दिनांकापासून त्यांची स्थाननिश्चिती करण्यात येईल अशी तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच या संदर्भात शासन परिपत्रक दिनांक ८ जुलै, २०१९ अन्वये अध्यापकांच्या पदोन्नतीस विलंब होऊन अध्यापकांचे नुकसान होऊ नये ही बाब विचारात घेऊन कॅस बाबत वेळापत्रक निश्चित करावे किंवा दर महिन्याला एका ठराविक दिवशी शक्यतो शेवटच्या आठवड्यात कॅस साठी बैठक आयोजित करावी, असे निर्देश शासनस्तरावरून देण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरची मार्गे (ता.कूरखेडा, जि.गडचिरोली) कडे जाणाऱ्या बेडगांव ते पुराडापर्यंतच्या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१७) १०८४४ (०५-०१-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरची मार्गे (ता.कूरखेडा, जि.गडचिरोली) कडे जाणाऱ्या बेडगांव ते पुराडापर्यंत संपूर्ण रस्त्यावर मोठे खड्डे तयार झाल्याने प्रवासी वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदर रस्त्याची तातडीने दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१७-०२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) बेडगांव ते पुराडा पर्यंतचे अंतर १८ कि.मी.चे असून त्यापैकी ९.०० कि.मी.चा रस्ता खराब होता.सदर ९.०० कि.मी. रस्त्यावर डांबरीकरणाचे काम प्रगतीत असून ९.०० कि.मी.पैकी ८.०० कि.मी. रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले असून रस्ता सुस्थितीत आहे. उर्वरीत १.०० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम प्रगतीत असून लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तथापि, सदर रस्ता वाहतुकीयोग्य आहे. याखेरीज सदर लांबीतील डोंगरगाव ते पुराडा पर्यंत रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम प्रगतीत आहे.
(३) सदर रस्ता नक्षलग्रस्त भागातून जात असल्याने नक्षल्यांकडून कामात वारंवार अडथळा निर्माण होत होता.या रस्त्यावर नक्षल्यांकडून दिनांक १ मे, २०१९ रोजी जांभुळखेडा गावा जवळ लेंढारी नाल्याच्या पूलावर स्फोट घडविण्यात आला. यामध्ये १६ पोलीस जवान शहीद झाले व एक वाहन चालकाचा मृत्यू झाला. तसेच दिनांक ३० जानेवारी, २०२१ रोजी गाडीची जाळपोळ करण्यात आली. सदर घटनांमुळे कंत्राटदाराने पुढील काम करण्यास नकार दिला. त्यामुळे दिनांक १६/१२/२०१९ च्या पत्राव्दारे सदर निविदा मुदतीपूर्व रद्द करण्यास मान्यता देण्यात आली.

त्यानंतर उर्वरित कामाकरीता नव्याने निवीदा काढण्यात आली. परंतु सदर लांबीमध्ये प्रथम करारनामा रद्द करेपर्यंत कोणतेही काम करणे शक्य नसल्यामुळे बऱ्याच प्रमाणात खड्डे पडले होते. तथापी सदर खड्डयांची खडी व मुरुमाने तात्पुरती दुरुस्ती करण्याची कार्यवाही प्रगतीत होती. तद्नंतर उर्वरीत कामाकरिता नव्याने निविदा निश्चित होऊन दिनांक ०३/०५/२०२१ ला कार्यारंभ आदेश देण्यात येऊन काम हाती घेण्यात आले आहे.

---

## राज्यातील ग्रंथालयांच्या थकीत अनुदानाची रक्कम देण्याबाबत

**(१८) ११२५१ (०६-०१-२०२२) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रंथालयांना मागील वर्षातील अनुदानाच्या दुसऱ्या टप्प्यातील निधी अद्याप मिळाला नसल्याचे दिनांक २५ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून ग्रंथालयातील कर्मचारी आणि सेवकांचे प्रलंबित असलेले वेतन, ग्रंथालय इमारतीचे भाडे व दैनंदिन स्वच्छता यासाठी ग्रंथालयांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील एकूण १२५०० ग्रंथालयांपैकी १२१४९ ग्रंथालये कार्यरत असून सन २०१२ नंतर शासनाने ग्रंथालयाच्या अनुदानामध्ये वाढ केली नाही, तसेच, मागील शैक्षणिक वर्षातील माहे सप्टेंबर ते मार्च दरम्यानचे अनुदान ग्रंथालयांना दिले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ग्रंथालयीन कर्मचारी मागील १ वर्षापासून विनावेतन काम करित असून सदर ग्रंथालयाचे वर्तमानपत्राचे देयक, विजेचे देयक व नवीन पुस्तकांची खरेदी इत्यादी बाबी थकित असून सदर प्रश्न मार्गी न लागल्यास राज्यातील सुमारे २१६१५ अंशकालीन कर्मचारी आंदोलन करणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार निधीची तरतूद करुन राज्यातील ग्रंथालयांचे सदरील थकित अनुदान तातडीने देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१७-०२-२०२२) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) राज्यात १२१४९ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत आहेत. सदर ग्रंथालयांना त्यांच्या वर्ग/ दर्जानुसार शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दिनांक २१/०२/२०१२ अन्वये विहित केलेल्या दरानुसार परिरक्षण अनुदान अदा करण्यात येते. दरम्यान शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या

परिरक्षण अनुदानात वाढ करण्यात आलेली नाही. मागील आर्थिक वर्षातील (सन २०२०-२१) माहे सप्टेंबर ते मार्च दरम्यानचे थकीत अनुदान शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दिनांक २२/०७/२०२१, दिनांक २०/०८/२०२१, दिनांक १७/११/२०२१ व दिनांक २१/०६/२०२१ अन्वये वितरित करुन अदा करण्यात आले आहे.

(३) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये ही स्वायत्त संस्थेकडून चालविली जातात. सदर संस्थेतील कर्मचाऱ्याची नियुक्ती, सेवाशर्ती, वेतन इ. बाबी या संबंधित स्वायत्त संस्थेशी निगडीत आहेत. शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाचे अनुदान व इतर मागण्यांच्या अनुषंगाने निवेदने प्राप्त आहेत.

(४) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचे सन २०२०-२१ मधील थकीत अनुदान अदा करण्यासाठी एकूण रुपये ४६.६६ कोटी इतकी रक्कम शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दिनांक २२/०७/२०२१, दिनांक २०/०८/२०२१ व दिनांक १७/११/२०२१ अन्वये वितरित करण्यात आली आहे. तसेच शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांचे सन २०२०-२१ मधील थकीत अनुदान रुपये ४६.९३ लाख अदा करण्यास शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दिनांक २१/०६/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील पती-पत्नी एकत्रीकरण बदल्या प्रलंबित असल्याबाबत

**(१९) ११३०९ (०६-०१-२०२२) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील पती-पत्नी एकत्रीकरण बदल्या मागील तीन वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार पती-पत्नी एकत्रीकरणाच्या प्रलंबित बदल्या तात्काळ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१८-०२-२०२२) :** (१) नाही.
(२) पती-पत्नी एकत्रीकरणांतर्गत माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये ४४ व जानेवारी, २०२१ मध्ये ०४ कर्मचाऱ्यांच्या विनंती बदल्या करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई व ठाणे शहरातील वाढती बांधकामे, वायु प्रदूषण, बदलती जीवनशैली व कबुतरांची वाढती संख्या यामुळे अस्थमाच्या आजारात वाढ होत असल्याबाबत

**(२०) २०३२६ (२१-०४-२०१७) श्री.अमरिशभाई पटेल : तारांकित प्रश्न क्रमांक ६९१५ ला दिनांक २१ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व ठाणे शहरातील वाढती बांधकामे, वायु प्रदूषण, बदलती जीवनशैली व कबुतरांची वाढती संख्या यामुळे सर्वच वयोगटातील अनेक व्यक्तींना अस्थमाचा आजार जडला असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीतून माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अस्थमा आजाराविषयी समाजात जागृती करण्यासाठी शासकीय रुग्णालयात "रुग्ण शिक्षण" देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२३-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक २४/०५/२०१६ रोजी मेडिकल जर्नल मध्ये प्रसिध्द शोध निबंधामध्ये नमूद केले आहे.
(२) असंसर्गजन्यरोग कक्षांतर्गत COPD हा कार्यक्रम राबविण्यात येत असून, सदर कार्यक्रमांतर्गत अस्थमा आजाराचा समावेश होतो. COPD या कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ ते सन २०१९-२० या कालावधीत १० जिल्ह्यांमध्ये जनजागृती व COPD रुग्णांचे उपचार करण्यात येत आहे, तसेच सदर कार्यक्रम सन २०२२-२३ पासून उर्वरित जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे.

जीवनशैली व अस्थमा आजारांविषयी समाजात जागृती करण्यासाठी शासकीय रुग्णालयात रुग्ण आरोग्य शिक्षण देण्यासाठी समाजमाध्यमांद्वारे जनजागृती करण्यात येत असून, याविषयीचा आरोग्य संदेश क्रियेटीव्ह शासकीय रुग्णालयांना पुरविण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.